**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार**

**न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करतो की:

माझे नावः निमेश तुकाराम माळी,

वय:४५ वर्षे, व्यवसायः खाजगी नोकरी,

राहणारः उडदवणे, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. अंदाजे ०२ महिन्यापूर्वी सुदर्शन कंपनीचे पिगमेंट प्लांटमध्ये पहिल्या मजल्यावर पंचनामा सुरु होता. सदर घटनास्थळ मला श्री. मानकर साहेब व पोलीसांनी यांनी दाखविले. तेथे पोलीसांनी आमची छायाचित्रे काढली. तेथे माझेसमक्ष पंचनामा करण्यात आला. आता मला दि. १४/०९/२०२२ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २०** देण्यात येतो.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी.एम.वर्मा यांच्यामार्फत**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी सुदर्शन कंपनीमध्ये काम करतो, श्री.मानकर माझे वरिष्ठ आहेत, त्यांचे सांगण्यावरून मी घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली, माझेसमक्ष सदर पंचनामा तयार करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, श्री.मानकर यांचे सांगण्यावरून मी आज न्यायालयात साक्ष देण्याकरीता आलो.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत,

sunil sakharam mahale Digitally signed by sunil sakharam mahale Date: 2023.04.21 17:15:33 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.२१.०४.२०२३ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.